# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

## जुलै, २०१६

### (महाराष्ट्र राज्य)

**समर्थन**

११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४
**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७/७३८७२७०५३३**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# पावसाळी अधिवेशन - जुलै २०१६

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१६-१७

**ठळक वैशिष्टे :**

- जुलै, २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु.१३ हजार ३२ कोटी २१ लाख १५ हजारांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. मुळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ४.८१ टक्के आहे.
- मार्च २०१६ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटींचा होता.
- जुलै पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २७ विभागांच्या ८३ मागण्या असून त्यात २४३ बाबी अंतर्भूत आहेत.
- जुलै, २०१६ मध्ये सादर केलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून ६ बाबींअंतर्गत काढण्यात आलेली रक्कम रु. ७६ कोटी ३९ लाख ५९ हजार आहे, जी पुरवणी मागणीच्या तुलनेत ०.५८ टक्के इतकी आहे.
- खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१६ मध्ये रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १) गृहनिर्माण, २) सार्वजनिक आरोग्य, ३) कृषि व पदुम, ४) महिला व बाल विकास, ५) शालेय शिक्षण या ५ विभागांनी सर्वात जास्त रु. ६ हजार ८४२ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे प्रमाण ५२.५० टक्के आहे.
- वर्ष २०१४-१५ मध्ये जून, २०१४ मध्ये २० हजार ३३८ कोटी २ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. तर वर्ष २०१५-१६ जुलै, २०१५ मध्ये १४ हजार ७९३ कोटी ६ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. वर्ष २०१६-१७ च्या जुलै अधिवेशनात मध्ये १३ हजार ३२ कोटी २१ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.

## जुलै, २०१५ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

*तक्ता क्र. १* *( रु. कोटीत )*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | ११.३९ | ११,३९२.२९ | ११,४०३.६९ |
| भांडवली | - | १,६२८.५२ | १,६२८.५२ |
| **एकूण** | **११.३९** | **१३,०२०.८१** | **१३,०३२.२१** |

- **जुलै २०१६ मध्ये वर्ष २०१६-१७ साठी रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. १३ हजार २० कोटी ८१ (९९.९२ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. ११ कोटी ३९ (०.०८ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.**

## मुळ मागणीच्या तुलनेत जुलै पुरवणी मागणीचे प्रमाण ४.५९ टक्के

*तक्ता क्र. २* *(रुपये कोटीत)*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|
| मार्च, २०१६ मुळ मागणी | २,७०,७६३.९३ | ९५.४१ |
| जुलै, २०१६ पूरक मागणी | १३,०३२.२१ | ४.५९ |
| **एकूण मागणी** | **२,८३,७९६.१४** | **१००.००** |

- **राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटी ९३ लाख एवढा होता. जुलै, २०१६ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. २ लाख ८३ हजार ७९६ कोटी १४ लाख झाला आहे.**

# सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र. ३* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| गृहनिर्माण | १ | १७५०.३६ | ३६९.२१ | ४७४.०० |
| सार्वजनिक आरोग्य | १ | १४६६.४५ | ६९१२.३८ | २१.२१ |
| कृषि व पदुम | ३ | १३४४.३२ | ७६८५.६८ | १७.४९ |
| महिला व बाल | १ | ११९४.८१ | १३४३.८७ | ८८.९० |
| शालेय शिक्षण | ३ | १०८६.२४ | ४०१४६.८९ | २.७० |
| **५** | **९** | **६८४२.२२** | **५६४५८.०३** | **१२.११** |

- **खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१६ मध्ये रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १) गृहनिर्माण, २)सार्वजनिक आरोग्य, ३)कृषि व पदुम, ४)महिला व बाल विकास, ५) शालेय शिक्षण या ५ विभागांनी रु. ६ हजार ८४२ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे प्रमाण ५२.५० टक्के आहे.**
- **गृहनिर्माण या विभागाने सर्वाधिक रु.१ हजार ७५० कोटी ३६ लाखाची पुरवणी मागणी केली असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण १३.४३ टक्के आहे.**
- **गृहनिर्माण या विभागाने नागरी क्षेत्रामध्ये 'सर्वांसाठी घरे' या योजनेसाठी रु. १ हजार ७५० कोटी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.**

## आकस्मिकता निधीतून काढलेल्या रकमा

*तक्ता. क्र. ४* *(रु. कोटीत)*

| अक्र. | विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | गृह | १४ | गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा उभारणे | ५५.०४ |
| २. | महसूल व वन | २८ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करणे | १०.०० |
| ३. | सार्वजनिक बांधकाम | ७४ | राज्यात न्यायिक अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या इमारतींमधील लहान बांधकामे यासाठी तरतूद | १.०५ |
| ४. | सार्वजनिक बांधकाम | ७६ | राज्यातील न्यायालयांच्या इमारतीमधील लहान बांधकामे | २.१० |
| ५. | विधि व न्याय | ११४ | राज्यातील दुय्यम न्यायालयांच्या कर्मचाऱ्यांचा वास्तववादी आढावा घेण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटासाठी खर्च | ०.२० |
| ६. | विधि व न्याय | १२१ | शिर्डी येथील १०१ दुकानदारांना न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसानभरपाई देण्यासाठी तरतूद | ८.०० |
| | | | **एकूण** | **७६.३९** |

- **वर्ष २०१६-१७ साठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत त्यापैकी आकस्मिकता निधीतून ४ विभागाअंतर्गत रु. ७६ कोटी ३९ लाख काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ०.५८ टक्के आहे.**
- **आकस्मिकता निधीतून सर्वात जास्त रु. ५५ कोटींची रक्कम गृह विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी नेटवर्क उभे करण्यासाठी काढण्यात आली असून या मागणीचा समावेश मुळ अर्थसंकल्पात करणे गरजेचे होते.**